म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.

# मेळ



REFBK-0012731
REFBK-0012731

...पादक

शरच्चंद्र बारमुख
बाळकृष्ण साटम

# स्व र मे ळ

संपादक

[शर]च्चंद्र स. बारमुख

[बा]ळकृष्ण हि. साटम

महाराष्ट्रांतील नवोदित कवींचा काव्यसंग्रह

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 3/8 ... दि. ...
ग्रंथांक 2428 नों. दि. 28-3-52
REFBK-0012731
REFBK-0012731
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 12039
नोंद : क्रमांक (स्थल प्रत)

## - श शां क प्र का श न -

गोरेगांव, मुंबई नं. ६२.

प्रकाशक :
**बाबाजी हि. सावंत**
**बाळासाहेब स. बारमुख**
१२, जवाहर नगर, गोरेगांव,
मुंबई नं. ६२.

●●●

सर्व हक्क प्रकाशकाधीन.

●●●

किंमत १ रुपया ५० न.पै.

●●●

मुखचित्र :
**बाळकृष्ण सावंत**
१२, जवाहर नगर, गोरेगांव,
मुंबई नं. ६२.

●●●

मुद्रक :
**मराठा प्रकाशन प्रेस**
२०/२८, मुगभाट लेन,
गिरगांव, मुंबई ४.

★

## अर्पण पत्रिका

प्रिय

**श्री. यशवंत कृ. रांजणकर**

यांसी —

# प्रकाशकांचे मनोगत....

लेखन ही एक श्रेष्ठ कला आहे, मग ते गद्य असो वा पद्य विशेषतः कवित्व ही कलेची पहिली पायरी आहे. असें निदान आम्हांला तरी वाटते. आजकाल असें किती तरी कवि आहेत. परंतु त्यांच्या कलेला प्रसिद्धी मिळत नाहीं, त्यांच्या कलेचे कौतुक होत नाहीं. आपल्या मराठी साहित्यांतील कांहीं प्रचलित मासिकें नवोदित कवींना पाहिजे तितके उत्तेजन देत नाहींत. याचा परस्पर विचार करून संपादकांनीं सदरहू काव्यसंग्रह काढण्याचे धाडस केलें. असो.

हा काव्यसंग्रह प्रकाशित करण्याच्या दृष्टीनें आम्ही अनेक प्रकाशकांशी विचारणा केली होती पण व्यर्थ ! कारण नवोदित कवींचा काव्यसंग्रह प्रसिद्ध केल्यामुळें कितीसा फायदा होईल. हे कुणीहि समजूं शकेल ! म्हणून आम्हीच आमच्या 'शशांक' प्रकाशनतर्फे हा काव्यसंग्रह प्रसिद्ध करण्याचें ठरविले.

आमच्या प्रकाशनातर्फे प्रकाशित होणारे हें पहिलेंच पुस्तक. नवोदित साहित्यिकांना प्रोत्साहन देण्यासाठी 'शशांक' प्रकाशनतर्फे अशीच प्रकाशनें प्रकाशित करण्याची आमची इच्छा आहे.

'स्वरमेळ' ची छपाई सुबक व आकर्षक केल्याबद्दल मराठा प्रकाशन प्रेसचे मालक व कामगार यांचे व ज्या कांहीं जाहिरातदारांनीं आम्हांला जाहिराती देऊन उपकृत केले त्यांचेहि आम्ही आभारी आहोंत.

दिनांक १ मार्च १९६३

—बाबा सावंत
बाळासाहेब बारमुख

# थोडेसें हितगुज....

आम्ही दि. १३ ऑक्टोबर १९६२ रोजीं आमच्या साहित्य मंडळ, गोरेगांवच्या वतीनें मुंबई उपनगरांतील नवोदित कवींचे संमेलन गोरेगांव येथें घेतले होते. याप्रसंगीं संमेलनाच्या अध्यक्ष-पदावरून भाषण करतांना कविवर्य प्रा. वा. गो. मायदेव यांनीं प्रस्तुतच्या उपक्रमाची प्रशंसा केली व नवोदित कवींचा एकादा काव्यसंग्रह काढावा असें सुचविलें. त्या दिवसापासून काव्यसंग्रह काढण्याचा विचार आमच्या मनांत घोळत होता. यानंतर याला प्रत्यक्ष स्वरूप येण्यासाठीं प्रेरणा दिली ती श्री. यशवंत कृ. रांजणकर यांनीं ! आमच्या आवाहनाला महाराष्ट्रांतील नवोदित कवींनी जी साथ दिली; त्यामुळेंच आज या कल्पनेला मूर्त स्वरूप आले आहे.

आमच्याकडे महाराष्ट्रांतील सर्व भागांतून कविता आल्या. त्यांतील कांहीं निवडक कविता या संग्रहांत समाविष्ट केल्या आहेत.

हा संग्रह प्रकाशित होईपर्यंत बऱ्याच जणांचे सहकार्य लाभले. त्यापैकीं गोरेगांव का. क. केंद्राचे संचालक श्री. चंद्रकांत शं. तेंडुलकर व श्री. मदन श्री. तासकर यांचा प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे. तद्वत या ना त्या प्रकारें सहकार्य करणारे प्रा. अविनाश केळकर, श्री. माधव कुलकर्णी व श्री. श्रीपाद डोंगरे यांचे आम्ही आभारी आहोंत. प्रकाशनाच्या बाबतींत श्री. बाबूराव (बाबाजी) साटम यांनीं खूपच मेहनत घेतली. कविवर्य श्री. वसंत वैद्य यांनीं आपुलकीनें 'स्वरमेळ' ला प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल त्यांचे आम्ही ऋणी आहोंत.

जय हिंद !

दिनांक १ मार्च १९६३

शा. स. बारमुख
बा. हि. साटम

# प्रास्ताविक

प्रसिद्धीच्या प्रकाशांत सतत तळपणारें साहित्यिक आणि टीका शास्त्रज्ञ आसपास अनेक असतांना ' स्वरमेळ 'चे संयोजक माझ्या-कडे कां व कसे आले याचें मला आश्चर्य वाटलें. कारण माझी साहित्य साधना आणि प्रसिद्धि दोन्हीहि विपुल नाहींत. कदाचित् त्यांच्यापैकीं एखाद्याला माझ्या एखाद्याच कलाकृतीनें आकर्षित केलें असेल तरीहि एखाद्या पुस्तिकेला प्रस्तावना लिहिण्याइतका अधिकार आपल्याला प्राप्त झाला आहे. असें मला वाटत नाहीं. संयोजकांचा उत्साह, आग्रह व भीड यामुळेंच मला हें काम अंगिकारावें लागत आहे.

नभोवाणीवरील कार्यक्रमाच्या आरंभी निवेदन करण्याचें काम कोणाला तरी करावेंच लागतें तशाच तऱ्हेचें हें काम माझ्याकडे आले आहे असें मी समजतों. वास्तविक पुढें होणाऱ्या मैफलीवर अगर ती ऐकणाऱ्या श्रोत्यावर त्या निवेदनाचा तसा कांहींच परिणाम होत नसतो तरीपण निवेदनाचा उपचार पाळावाच लागतो. माझें काम हा उपचार पाळण्याचें आहे.

या स्वरमेळांत सुमारें ३८ कवींनीं आपला स्वर मिळविला आहे. या विविध स्वरांचा मेळ बेमालूम जमला आहे. ही सारी मंडळी तरूण, नवोदित आणि अज्ञात आहेत. तरीहि त्यांच्यापैकीं कांहींची तयारी घराण्याचे नांव सांगणाऱ्या प्रथितयश गायकां सारखी आहे. पुढील ओळी या नवख्या अगर उमेदवारी कर-णाऱ्या कवीच्या आहेत हें मुद्दाम सांगावे लागेल इतक्या त्या सफाईदार व काव्य पूर्ण उतरल्या आहेत.

**हिमालयाची गंगा येते जशी दक्षिणेंत**
**सह्यगिरीचे पाइक न्हाती गंगे जमुनेंत**

कालमानानुसार येथें देशभक्तिपर कवितांचा व समरगीतांचा बहर आलेला आहे. अशा स्वरूपाच्या सुमारें ७ कविता यांत आहेत. त्यांतील कांहीं प्रासादिक व आवेशपूर्ण आहेत.

**कशास परतीची पाउल वाट**
**ही रणशूरांची जात नसे**
**म्यानाबाहेर तलवारीला**
**रक्ताचीच लाज असे**

समरगीतांत आढळणाऱ्या अशा कांहीं ओळी मनांत सहज रेंगाळत राहतात.

प्रणयविषयक कवितांतील तरल कल्पनांचा विलास हृद्य आहे.

**नारळीच्या झापांतून**
**झिरपणाऱ्या चांदण्यांत**
**किरणांच्या करकरणाऱ्या**
**सळयांच्या हिंदोळयावर**
**झेपावत आहे दरवळत आहे**

हें रातराणीचें वर्णन प्रत्ययकारी नाहीं असें कोण म्हणेल ? आशयाला साजेशी अभिव्यक्ति येथील अनेक कवींना साधलेली आहे. ज्या ठिकाणीं भावना उत्कट असते त्या ठिकाणीं अभिव्यक्तिहि प्रत्ययकारी असते.

या संग्रहांतील एक विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे या कवितांची छंदोबद्धता. मुक्तछंदाच्या या युगांत जी थोडी फार छंदोबद्ध कविता ऐकावयास अगर वाचावयास मिळते ती एकतर

जुन्या पठडींतील कवींची अगर नभोवाणीच्या नियंत्रकांकडून प्रासंगिक कविता लिहिण्याचा आदेश मिळाल्यावर लिहिली गेलेली नवकवींची छंदोबद्ध कविता लिहिणें म्हणजे आपण मागासलेले आहोंत असें कबूल करणें होय अशी कित्येकांची समजूत झालेली आहे. स्वरमेळच्या कवींना या समजुतीची बाधा झालेली नाहीं येथील बहुतेक सर्व छंदोबद्ध कविता मात्रा दोषापासून अगर यतिभंगाच्या दोषापासून अलिप्त आहे. जे किरकोळ दोष आहेत ते अल्पप्रयासानें दूर करतां येण्यासारखे आहेत.

तारूण्यसुलभ अनुकरणप्रवृत्तिहि येथें डोकावतांना दिसते. ती टाळतां आली असती तर बरें झाले असतें. कृष्णापासून क्रांतिपर्यंतच्या सर्व विषयांना स्पर्श करणारा हा 'स्वरमेळ' रसिकांचे रंजन आणि उद्बोधन करील असा भरंवसा आहे.

स्वरमेळांत सामील झालेले कलावंत सोलो केव्हां ऐकवितात याकडे माझ्यासारख्या रसिकांचे लक्ष लागल्यास नवल नाहीं.

निवारा, नौपाडा.<br>
ठाणें.<br>
दि. १३-२-६३.

वसंत वैद्य

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ
अनुक्र ........ दि: ........
क्रमांक ........ नों. दि: ........

# श्रेयनामावलि :


| अनुक्रम | कवीचें नांव | पा. नं. |
|---|---|---|
| १ | शि. वि. दवलकर | १३ |
| २ | र. द. वैद्य | १३ |
| ३ | गु. आ. बांदेकर | १४ |
| ४ | स. के. सावंत | १६ |
| ५ | स. के. सावंत | १७ |
| ६ | श. स. बारमुख | १८ |
| ७ | ह. म. दीक्षित | १९ |
| ८ | बा. हि. साटम | २१ |
| ९ | प्र. ना. शेणई | २२ |
| १० | बा. हि. साटम | २४ |
| ११ | बा. बा. अमृते | २५ |
| १२ | र. मु. कामत | २७ |
| १३ | श्री. चिं. नगरकर | २८ |
| १४ | म. श्री. तासकर | २९ |
| १५ | प्रीतम अडांगळे | ३० |
| १६ | प्रीतम अडांगळे | ३१ |
| १७ | ना. न. पुरव | ३२ |
| १८ | म. द. गोडसे | ३३ |
| १९ | गोविंद तनय | ३४ |
| २० | चंद्रकांत वाडकर | ३५ |
| २१ | चंद्रकांत वाडकर | ३७ |
| २२ | दि. म. घाटे | ३८ |
| २३ | ह. आ. कुबल | ३९ |
| २४ | प्र. मु. सातपुते | ४० |
| २५ | प्र. मु. सातपुते | ४२ |
| २६ | ल. ब. चव्हाण | ४३ |
| २७ | अविनाश वाणी | ४४ |
| २८ | अविनाश वाणी | ४४ |
| २९ | एकनाथ मांडे | ४६ |
| ३० | प्र. वि. इनामदार | ४७ |
| ३१ | य. कृ. चिखलीकर | ४८ |
| ३२ | शं. गो. माईणकर | ४९ |
| ३३ | इनासकून | ५० |
| ३४ | इनासकून | ५१ |
| ३५ | भा. रा. गोळे | ५२ |
| ३६ | भा. रा. गोळे | ५३ |
| ३७ | सु. ना. मालंडकर | ५४ |
| ३८ | ज. कृ. नाईक | ५५ |
| ३९ | मु. अ. चव्हाण | ५६ |
| ४० | नानक अहेर | ५७ |
| ४१ | रा. तु. चौधरी | ५८ |
| ४२ | रं. शं. बंदसोडे | ५९ |
| ४३ | रं. शं. बंदसोडे | ६० |
| ४४ | सौ. नलिनी गं. देवघरे | ६१ |
| ४५ | अरविंद एकबोटे | ६२ |

## शद्बरंजन स्पर्धेची अत्यल्प किंमतींतील संग्रह्य पुस्तकें

| | कि. न.पै. | | कि. न.पै. |
|---|---|---|---|
| श्री मनाचें श्लोक | ६ | भगवत्‌गीता | १५ |
| अभंग तुकयाचें | ३० | शनिमहात्म | १५ |
| महाराष्ट्र गौरव-गीतें | १-५० | श्री दासबोध | २ रु. |
| शिव लिलामृत ( अकरावा अध्याय ) | १० | गणेश गौरव स्तोत्र | २ ,, |
| | | | न.पै. |
| श्री व्यंकटेश स्तोत्र | १० | श्री मारुती उपासना | १५ |
| श्री पंचरत्न हरिपाठ | ३० | आपला राष्ट्रध्वज | २५ |
| धर्माचार | ५० | | |

शद्बरंजन स्पर्धा प्रकाशनाचे प्रमुख विक्रेते :-

**मे. समर्थ ग्रंथभवन, बनाम हॉल लेन, मुंबई नं. ४.**

**– पुस्तकांची मागणी परस्पर त्यांच्याकडेच करावी –**

पोस्टेजसह पैसे आगाऊ पाठवा व्ही. पी.ची प्रथा नाहीं.

# प्रतिभा स्टुडिओ

**– गोरेगांवातील एकमेव फोटोग्राफर –**

लहान मोठें ग्रुपचें सुंदर व कलात्मक फोटो
तसेंच एन्‌लार्जमेंट, डेव्हलपींग व प्रिंटींग
करितां अवश्य भेटा.

स्टेशन रोड, गोरेगांव ( पश्चिम ),
मुंबई नं. ६२.

# गुरुदत्त निकेल प्लेटिंग वर्क्स

इलेक्ट्रो प्लेटींग, निकेल सिल्व्हर प्लेटींग, कुपर ऑक्सिडायाझिंग वगैरे सर्व प्रकारचीं कामें उत्तम प्रकारें करून देण्यांत येतील.

ठिकाणा—९वी खारवा गल्ली, फॉकलंड रोड, मुंबई ४.

प्रोप्रायटर – श्री. पांडुरंग धाकटुजी सावंत.

---

# PRAKASH CABLES

**Tested At--Government Test House, Alipore.**

*Manufactured By :–*

**M/s Bombay Cable & Rubber Industries**

**Aarey Road, Goregaon, (East) BOMBAY-62.**

*Distributours :*

**M/s Endeavour Electric Co.**

69, Kitehen Garden Lane, Shreeji Bhuvan,
Loharchawl, BOMBAY-2.

*Dealers in* : **All Sizes of Cables and Wires.**

---

# श्री. पांडुरंग धाकटुजी सावंत

आमच्या दुकानांत किटसन् पेट्रोमॅक्स लाईट भाड्यानें मिळतात. तसेंच प्रत्येक जातीचें स्टोव्ह रिपेरिंग करून मिळतील.

ठिकाणा-घर नं. २४-२६ ठाकुरद्वार रोड, हलाई लोहाणा महाजन वाडीजवळ, मुंबई नं. २.

# - खुशाल ब्रदर्स -

आमच्याकडे स्त्रियांना लागणारे सर्व प्रकारचें सौभाग्य वस्तू अलंकार, गॅरंटेड बांगड्या, मंगळसूत्रें, गंगावणें, कटलरी, एम्ब्रायडरी, मुंडावळ्या, लग्नाचा हिरवा चुडा आणि आणि शुभप्रसंगी भेट देण्यास योग्य अशा वस्तूं माफक दरानें मिळतील.

तसेंच पर्सला चेन लावून मिळेल.

पत्ता :– १७१, गुलाब भुवन,
धोबी वाडी नाका, ठाकुरद्वार रोड, मुंबई २.

## प्रगती क्लासेस

आरे रोड, रेल्वे फाटका जवळ, गोरेगांव,
मुंबई ६२.

१) एस्. एस्. सी. मार्च/ऑक्टो. इंग्रजीचे खास वर्ग.

२) सुरवाती पासून इंग्रजी शिकण्याची खास व्यवस्था

**भेटण्याची वेळ –**
सकाळ संध्याकाळ ७॥ ते ९.



वर्षप्रतिपदेच्या सुमारास महाराष्ट्रांत प्रकाशित होत आहे.

'चित्र-शारदा' कृत

## एका ध्येयवादी डॉक्टरची जगावेगळी गाथा

# तें माझें घर

: कथा :
**यशवंत रांजणकर**

: गीतें :
**रवीन्द्र भट**

: संवाद :
**दिनकर द. पाटील**

: संगीत :
**सुधीर फडके**

दिग्दर्शन — **गणेश भट**

— घरांतील आप्त मंडळी —

**राजा परांजपे ★ सीमा ★ रमेश देव ★ शरद तळवलकर**

**नायमपल्ली ★ उमा ★ नीलम ★ मधू आपटे**

**बी. माजनाळकर** आणि **बाबुराव पेंढारकर**

व **मोहन चोटी.**

मराठी ग्रंथ ... ग्रं. क्र. 92639

## एक : आव्हान

* शिवराम विश्राम देवलकर *

**परिचय**—मुंबईत मिलमध्यें नोकरी परळ लोकनाट्यकलापथकाचे सभासद. मराठा, युगांतर, साहित्य स्वप्न, हेमंत आदी साप्ताहिक व मासिकांतून कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. 'तुका म्हणे ऐशा नरा' नांवाचे नाटक व 'शब्दांचे दुकान' शीर्षकाची विनोदी एकांकिका लिहिली आहे.

हीच गर्जना हीच आण देश रक्षणा देऊं प्राण
असो किती ही सीमेवरती शत्रू जरी बलवान
कळीकाळाते रगडीत जाऊ चला पेटवूं रान ।
स्वातंत्र्याचे करूं जतन
वृद्ध तरूण या धांवून
परचक्राते रोखीत ठोकीत निनादीत आस्मान ।
पोलादी नव ऐक्य सांधूनी
निर्धाराचे कवच लेवूनी
दिशादिशांना जारे व्यापीत फडकवित निशाण ।
समर धीर हा शूर सेनानी
सज्ज ठाकला दंड ठोकूनी
विजयी विर हा भारत माझा देऊनीया आव्हान ।

● ● ●

## दोन : अशा वेळेला

* रमेश दत्तात्रय वैद्य *

**परिचय**—अंधेरी ( मुंबई ) येथें वास्तव्य, पश्चिम रेल्वेच्या बॉम्बे सेंट्रल येथील विभागीय कार्यालयांत नोकरी, शालेय शिक्षण

गुजराती भाषेतून झाले. हिंदी व मराठी भाषेतून काव्य व गीत लेखन. गायन व संगीत दिग्दर्शन हा एक आवडता छंद. कांहीं संगीतिका दिग्दर्शित केल्या आहेत

**चालली होती किनाऱ्यावरुनि**
**जलाची राणी रेखिव कहाणी**
**सडक्या कुजक्या जीवनाची.**

**बसली होती विश्व व्यापूनि**
**रात भयाणी रचित गाणी**
**सडक्या कुजक्या जीवनाची.**

**बैसलें होते वडाच्या पानांत**
**फांदीच्या कोनांत घुबड म्हणत**
**सडकें कुजकें जीवन हें.**

**अशा वेळेला कशी नि कोठून**
**गत स्मृतिची जोडली सांकळ**
**पडली तुटून खळ्ळ खळ्ळ.**

●●●

## तीन : क्रांति

*** गुणनंदन आत्माराम बांदेकर ***

**परिचय**—सन १९४४ मध्यें शिरोडा येथें जन्म, रूपारेल महाविद्यालयांत शिक्षण घेत आहेत, लहानपणापासून वाङ्मयाचा नाद. अखंड वाचन. काव्याविषयीं बालपणापासून आस्था. वयाच्या १६ व्या वर्षापासून काव्य लिहिण्यास आरंभ.

**मी तर क्रांति करणार**
**जगाचे रूप नवे घडविणार ॥ ध्रृ० ॥**

माझे सौंदर्य
माझे लावण्य
फुलत्या निसर्गाचे
तेंच जगास सौंदर्यमय करणार ॥ १ ॥

माझा तोरा
माझा ताठा
भव्य हिमालयाचा
तोच जगाची मान उंच उंचविणार ॥ २ ॥

मी खोल
मी गंभीर
पॅसिफिक महासागर
तोच जगास न उथळविता बुद्धि खोल बनविणार ॥३॥

मीच कायदा
मीच राज्यकर्ता
मीच रामराजा
मीच जगाला एकछत्री संविधानांत बसविणार ॥४॥

मीच वर्ण
मीच जात
मीच धर्म
मीच जगांत मानवता धर्म बीज पेरणार ॥५॥

माझी प्रतिभा
माझी प्रज्ञा
दिव्य वाल्मीकिची
तीच जगाच्या नाभींत मी उत्स्फूर्तविणार ॥६॥

मीच सत्त्व
मीच रजस्
मीच तमस्
मीच त्रयी, या त्रयींच्या धाग्यानें जग ओंवविणार ॥७॥
मीच नाद
मीच गंध
मीच धुद
या त्रिवेणी संगमानें जगबाग मी नादविणार ॥ ८ ॥
मीच शिव
मीच जीव
मी सुंदर
ही त्रयी जग ओसाड वाळवंट फुलविणार ॥ ९ ॥
काळाच्या पायांतील
मीच घुंगुरवाळा
जग वेल्हाळ
नाचेल झन् झन् ताल धरोनि माझ्या तालावर ॥ १० ॥
मीच अणूरेणू
मीच तत्त्वध्येय
मीच ब्रह्मांड
मीच विधाता-ब्रह्मदेव जग-नवे निर्मिणार ॥ ११ ॥

●●●

## चार : कल्पना

* सदानंद केशव सावंत *

**परिचय**—मालवण तालुक्यांतील तळगांव गांवचे रहिवासी नोकरीनिमित्त मुंबईत वास्तव्य. कोंकणातील सृष्टीसौंदर्यापासून

कविता लिहिण्याची स्फूर्ति, शाळेतील मासिकांतून कविता प्रसिद्ध झाल्या आहेत.

कल्पिले मी मनात मांडे, येशील कां ग माझ्या जीवनी
ओळख नव्हती झाली तेव्हां बावरलीस कां तूं पाहुनि
ध्यास मनाला नव्हता दुसरा, चंद्राला जणूं चांदणी
उंच नभातून, कधी ढगातून पाहिलें मी या नयनी
वेळीं अवेळीं जागृत होता कल्पक मुर्ति पुढें उभी
अदृश्य शक्ति गुलाल उधळी निरोप सांगे घरी जाऊनि
भास मनाला तूं किती जवळी अंध श्रद्धा तुझ्या मनी
वाट चाल आयुष्य अर्पिले जीवन माझे तुझ्या पुजनी

●●●

## पांच : हास्य

* सदानंद केशव सावंत *

हसण्यातचि सौख्य खरे लाभते मना
अस्थिर ह मन माझे कां स्थिर होईना
सुख दुःख, धडपड आजार यातना
बोलती मित्र अपशब्द अश्रू ( ये ) नयना
हंसण्यातचि सौख्य खरे लाभत मना ॥ १ ॥

लहान थोर गोपाळ किती भेटती मला
हास्य मुखी बाळ बोबडे बोलते अहा
हसण्यातचि सौख्य खरे लाभते मना ॥ २ ॥

●●●

# सहा : मला हवें हे

*** शरच्चंद्र सदाशिव बारमुख ***

**परिचय**—तळेगांव दाभाडे गांवचे रहिवासी. नोकरीनिमित्त मुंबईत वास्तव्य नूतन विद्यामंदिर व फर्ग्युसन कॉलेजमध्यें शिक्षण. बालपणापासून साहित्याची आवड. गोरेगांव कामगार कल्याण केंद्राचे सल्लागार, साहित्य मंडळाचे कार्यवाह, 'पाणपोई' चे संपादक अनेक ठिकाणी व आकाशवाणीवर कवि संमेलनात भाग घेतला आहे.

उंच भव्य प्रासादांत
चंद्रमौळी झोपडींत
नेत्र न्याहाळीती माझे सुखस्वप्न आकारले ॥ १ ॥

कांदा भाकर घासांत
लाडू, पेढे मिष्टान्नांत
चाखावया दिव्य गोडी रस रसनीं तिष्ठले ॥ २ ॥

उंच चिमणी धुरांत
धुम्रपानाच्या दर्पांत
धूप-गंध हुंगावया मन माझें आतुरलें ॥ ३ ॥

कर्णकटु आवाजांत
अति कोमल स्वरांत
सुर—संगति ऐकाया कान माझे तहानेले ॥ ४ ॥

दीन राकट हातांत
श्रीमंतीचे मऊ हात
मैत्रीसाठीं द्यावयास हात माझे स्फुरावले ॥ ५ ॥

## सात : लपंडाव

*** हरेश्वर महादेव दीक्षित ***

परिचय—सफाळ्याचे रहिवासी. झुंजार पत्रकार व साहित्यिक म्हणून प्रसिद्ध आहेत. दै. नवभारतमध्यें उपसंपादक होते. कांहीं वृत्तपत्रांचे ते वार्ताहर आहेत. मनोरंजन, मौज, बालसुधा ह्या मासिकांत कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. ग्रामपंचायत, शेतकरी संघ, शिक्षण संस्था, दूध उत्पादक संघ आदी सार्वजनिक क्षेत्रांत प्रामुख्यानें भाग व तेच त्यांच्या यशाचे गमक !

वसन नूतन बालिका तयालि होती
कुमुदिनी ही कासारी फुलली होती
जात आहे ती आईच्या घराला
म्हणुनी आनंदलि आज फार बाला ॥ १ ॥

जाहला कीं संपूर्ण एक मास
पत्र नाहीं तेथूनी अजुनि खास
आज आहे माहेरी जावयाचे
आणि येथे ही नात—जावयाचें ॥ २ ॥

तोंच आला घ्यावया बंधुराज
कमल-भगिनीने चढवियला साज
तिने जव्हां घेतलें निरोपाला
चित्र पाहे पतिचेच्च फिरुनि बाला ॥ ३ ॥

उभयतां ती गृहामाजी आली
माय भगिनीनें द्रिष्ट काढियेली
तोंच प्रेमाश्रू कढत गाळियेलें
आणि मातेनें शिर्ष हुंगियलें ॥ ४ ॥

दोन मास जाहलें येऊनिया
लपंडावाची गोष्ट काढिलिला
ताई आपण ग खेळु लपंडाव
चुप...बोलोनी दावियला डाव ॥ ५ ॥

ताई—सासरी ही गोष्ट जर कळेल
सासुबाई चांडाळ मज वदेल
लिला—कोण जाई सासरी सांगण्यास
तुझें सासर तर येथोनि वीस कोस ॥ ६ ॥
चल ग यमुने प्रांगणी खेळण्यांस
इन्दु खेळे घेवोनि तारकेस
सर्व बाळे खेळांत मग्न झाली
भान हरपोनी सर्व दंग झाली ॥ ७ ॥
ताई वरती इतक्यांत हार आली
युगुल झांकाया येथ लिला आली
उतरला तो तांग्यातुनि तरूण तेथ
लक्ष त्याचें ही वेधियलें तेथ ॥ ८ ॥
कमल कान्तानें कमलेस देखियलें
आणि कमलेचे युगुल झांकियलें
सु-न-ध्या-हा आवाज होई जेव्हां
मारियेला झटका ही तिनें तेव्हां ॥ ९ ॥
मान वळवोनी कमल फिरुनि पाही
तोंच पाठींशी कमल- पती पाही
खेळ भार्ये तुज येत असे छान
दंग होवोनी हरपियलें भान ॥ १० ॥

× × ×

काय ? देऊं तुज आज बक्षिसाला
आणि घालीं मुद्रिका तर्जनीला

92639.

●●●

## आठ : मानवतेचा नवा उष:काल

* बाळकृष्ण हिरोजी साटम *

**परिचय**—गोरेगांव ( मुंबई ) वास्तव्य. साहित्याविषयी आवड. बालपणापासून चित्रकलेचा छंद. गोरेगांव कामगार कल्याणकेंद्राचे सल्लागार. साहित्य मंडळाचे सहकार्यवाह. "पाणपोई" चे संपादक.

सूर्याच्या त्या सहस्र रश्मी
वंदन करिती मानव जाती
हळू हळू तो येई वरती
तापची देई सर्व घरोघरी
नभी विलसे मध्यानें तदी
विसावा घेई सारी सृष्टी
संध्या समयी अक्षांशावरी
करि सृष्टी सुवर्णरूपी
रातींच्या त्या निरव शांती
कोठूनी येई सुगंध धरती
रातरानीच्या धुंद सुगंधें
होई बेहोश वसुंधराती

चंद्राच्या त्या शीतल छायीं
कुणी युगुलें प्रेमिकांची
मस्त विहरती नदी किनारीं
पहाटेच्या शांत समयीं
वारा वाहे बेभान विरहिन
पांखरांच्या किलकिलाटांत
मानवतेचा नवा उषःकाल !

●●●

## नऊ : भाग्यबिंदू

* प्रफुल्लचंद्र नारायण शेणई *

**परिचय**—सन १९४४ सालीं मुंबईत जन्म. कविता लिहिण्याची प्रेरणा एका मित्रापासून मिळाली. सध्यां शालेय शिक्षण घेत आहेत खूप वाचन हाच छंद. पैंजण आणि इतर मासिकांत कवितांना प्रसिद्धी.

खडकावरी जैसा अंकुर वाढे तत्सम मी वाढिलों
परि आतां धनपतिचा दत्तकलेक जाहलों
मग थाट कायतो माझा पुसतां ?
नच उभ्या जन्मीं मी कधीं सुवर्णानें सजलों
भरजरी वस्त्रें अंगीं, चकाके मौक्तिक माळ कंठी आतां
कानीं भीकबाळी, आहेच कडीतोडे मम हातीं आतां

वनवासामध्यें जीवन घालविलें, जिर्णपर्ण
खोपटींत राहिलेलों
पाहिला नच कधीं बागबंगला, पामरासंगे खेळलेलों
परि मिळे आतां राहण्यां नवकोनी टूमदार बंगला
भोंवति नयनमनोहर बगीचा नित्य बहरलेला
भूकेला कोंडा मिळविण्यां चार दारीं वणवण हिंडलेलों
" छीः थू " जनांकडूनिया असे ऐकूनि जीवन कंठीलेलों
ईश कृपेनें आसनि बसुनिया सुग्रासान्न जेवूं लागलों
आहाहा ! किती विचारूं ! किंकर येति जोडूनिया कर
' जी ' म्हणूनिया पुसती, काम काय सावकार
शिरीं धोंडा घेऊनि, जिर्ण फाटक्यां
कांबळीवर पहुडलेलों
परि आतां कुसुमाहून कोमल शय्येवर
नित्य झोपूं लागलों
मधूर गोष्टीं गीतें कसली ? कोंठलीं ? शिव्या ऐकून
बेजार जाहलेलों
मिळें करण्यां गुजगोष्टीं नित, नित्य मधुर गीतें
ऐकूं लागलों
आज उद्यांचा विचार करूनिया कोमेजलो,
क्षिणलो-भागलेलों
दुःखाचा धागा खुंटला, सुखाचा धागा ओढूं लागलों
काळ क्रीडा चक्रामधूनिया, एक भाग्यबिंदू
वांट्यास मम आला

● ● ●

# दहा : चिन्यांचें करूं छिन् छिन् छिन् !

*** बाबाजी हिरोजी साटम ***

**परिचय** — यांना लेखन कलेची बालपणापासून आवड. दोन वर्षें 'बाल ज्ञानदीप'चे संपादक. म्यु. स्कु. क. तर्फे ठेवलेल्या निबंध स्पर्धेत त्यांनीं पहिल्या नंबरचे व इतर अनेक बक्षिसें मिळविलीं. 'मराठा जागृती'चें कार्यवाहक. त्यांनीं लेख विशेषतः नाट्य छटा, कविता, मंगलाष्टकें लिहिलीं असून त्यांचें लिखाण बाबा उर्फ बाबूराव साटम म्हणून प्रसिद्ध होत असते

भारतभूच्या प्राणां करितां
आज धांवलीं कोटीं जनतां
प्राण बलीचें बांधुनि कंकण
चिन्यांचें करूं छिन् छिन् छिन् ॥ १ ॥
शांतीचे पाईक, शांती आमुच्या मनीं
सोडूनि तिज, उतरू समरांगणी
चाळिस कोटींचा कोट करोनीं
चिन्यांचें करूं छिन् छिन् छिन् ॥ २ ॥
पराक्रमाची तव अमुच्या ख्याती
नसां नसां तुनि हिंमत वसती
मारू अथवा मरूं गर्जुनी
चिन्यांचें करूं छिन् छिन् छिन् ॥ ३ ॥
भगवत् गीता काय सांगते नीती
शत्रूला माती चारण्या कुणाची भीती
तोंच निश्चय अपुल्या मनीं करोनी
चिन्यांचें करूं छिन् छिन् छिन् ॥ ४ ॥

परम पवित्र भारत भूमि
वीर पुत्रांची सुवर्ण खाणी
तिला रक्षिण्या प्राण अर्पुणी
चिन्यांचें करूं छिन् छिन् छिन् ॥ ५ ॥

शांतश्रीची ज्योत विझवूनी
भडकून उठली विरश्री झणीं
रक्षिण्या हिमालया एक होऊनी
चिन्यांचें करूं छिन् छिन् छिन् ॥ ६ ॥

शिवबाची मर्दुमकिची मायभूमी
राष्ट्र रक्षिण्या पुढें, खड्गातें घेऊनी
इतिहासाची सुवर्ण पानें लिहुनी
चिन्यांचें करूं छिन् छिन् छिन् ॥ ७ ॥

● ● ●

## अकरा : छन्द्

* बा. बा. अमृते *

**परिचय**—पंचविशील तरुण. वेस्टर्न रेल्वेमध्यें नोकरी. राष्ट्रभाषा कोविदपर्यंत अभ्यास झाला असून वाचन, लेखन, चित्रकला तसेंच ज्योतिष यांचा त्यांना व्यासंग आहे. त्यांचे लेख, कविता व लघुकथा 'बाळ अमृते' या मूळ नांवानें तसेंच 'लक्ष्मीतनय' या टोपण नांवानें प्रसिद्ध झालेले आहे. वसती स्थान—पापडी पो. वसई ( ठाणें ).

छंद मनाला, छंद जीवाला
छंद लागला, अखंड मजला
तुझिया सहवासाचा ॥ ध्रु० ॥

छंद माझा मनो मिलनाचा
ध्यास मजला प्रेमसुखाचा
तव प्रेमाविण जगुं मी कैसा
विरहीं व्याकुळ जीव माझा
हृदयीं धग धग
मनींहि तगमग
तुजविण मजला, शून्य शून्य जग
कळा लागल्या मम जीवाला ॥ १ ॥

वाणी माझी दुःख स्रवते
नयनीं माझ्या अश्रु पूरते
त्या अश्रूनीं वाहुनि जाती
विश्वासाचे भाव-बंध ते
भरलें ग ऊर
उठलें काहूर
गुढ व्यथेची सल ती निरंतर,
दुःख जाईना सोडुनि मजला ॥ २ ॥

स्वप्न माझें अधुरें अपुरें
उधळुनि गेलें विश्वचि सारें
त्या विश्वाची जुळवित शकलें
फुंकर घालुनि दुःखी मनावरी
हरखुनि, निरखुनि
अविरत झुरूनी
सुखद स्मृतींचा आठव करुनि,
सावरूं कुठवर मी ग मनाला ॥ ३ ॥

●●●

मराठी ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रमांक २७ ३४८०० वि: कविता
क्रमांक २७ नों दि: २०३।१

# बारा : तिळगूळ

* रमाकांत मुकुंद कामत *

**परिचय**—आकेरी ( सावंतवाडी ) येथील रहिवासी. नोकरी-करितां गोरेगांवात वास्तव्य. सार्वजनिक कार्यांची हौस. कविता, नाटिका, लेख लिहिण्याचा छंद. अनेक मंडळाशी संबंध.

गेलासी सोडून दूर मजला
बेचैन होते मन
नीतिचा पथ दाविलास मजला
कष्टा विना ना धन
नीतिचा पथ जो जन तुम्हीं
ऐसे मला वागणें
ज्या मार्गीजन थोर, थोर वळति
त्या मागुनीं चालणें
द्यावें मी तीळगुळ आज तुजला
कैसे किती दूर मी
कोण्या दूतकरी मी धाडू तिकडे
येते निराशा मनीं
स्नेहाचें परि गुळ लावूनी तिळा
या शब्द रूपी आतां
प्रेमें दूत करूनि लेखणीस या
अर्पि असें तत्वतां

● ● ●

# तेरा : " ....देवा ! नें आधीं मजला "

* श्रीकांत चिंतामण नगरकर *

**परिचय**—मूळचे रहाणारे नगरचे. शालेय व महाविद्यालयीन शिक्षण नगरलाच झाले. सध्यां पुण्याला इंजिनियरिंगच्या शेवटच्या वर्षाला आई कवयित्री आहे; तिच्यामुळेंच काव्याची स्फूर्ति. काव्याशिवाय इतर छंद गायन, ट्रॅन्झिस्टर रेडिओ तयार करणें यांत्रिक उपकरणें तयार करणें आदि.

काय पाहते, कांहीं कळेना
काय ऐकते, कांहीं सुचेना
वसंत गेला संपुन केव्हां, ग्रीष्म कसा पातला
...देवाने आतां मजला ॥ ध्रु० ॥

बोल बोबडे काल ऐकले
ह्या हातांनी न्हाऊं घातले
पाना आधीं पुष्प गळालें, न्याय कसा असला ॥१॥

काल जाहले मौंजीबंधन
अजुन न सुकले चंदन-लेपन
प्रसाद मिळण्या वांचुन, आधीं यज्ञ कसा संपला ॥२॥

निज देहाचे करून निरांजन
फुलवित होते अंधच जीवन
बीज कोसळे घरट्यावरती, कल्पवृक्ष सुकला ॥ ३ ॥

भवसिंधूचा अथांग सागर
दुःख भोवरे फिरती गरगर
नाव ठेवुनी जलाशयावर, नावाडी बुडला ॥ ४ ॥

वट वृक्षाच्या छायेखालीं
आधारास्तव बसलो खालीं

झंझावाती—छाया कसली—वृक्षच कोसळला ॥ ५ ॥

अश्रू सुकले गालावरती
फुटली पणती, विझली ज्योति
बेसुर झाले जीवन संगीत, तंबोरा फुटला ॥ ६ ॥

आयुष्याच्या संध्याकाळीं
इच्छित होते सौख्य कपाळीं
आयुष्याचें नाटक झालें, पडदा अन् पडला ॥ ७ ॥

हवाच होता एक देह जर
मृत्यूस्तव मी होते आतुर
वृक्ष सोडूनी, ज्वलनास्तव तूं अंकुर कुस्करला ॥ ८ ॥

●●●

## चौदा : " जीवन "

* मदन श्री. तासकर *

**परिचय**—ठाणे येथील रहिवासी. बी. ए. ( ऑनर्स ) पर्यंत शिक्षण. ठाणें येथील समाज सेवक. १९५२ सालीं सिद्धार्थ कॉलेज-मध्यें पदवीधर झाले. पोलीस खात्यांत नोकरी.

भासे जीवन सुखाचे
परी डोंगर दुःखाचे
सहन करावे कैचे
तूंचि जाण ॥ धृ० ॥

वसे मनीं मत्सर
सांडोनि दे सत्वर
जीवन हलके तत्पर ॥ १ ॥

फुलवात असें कां जीवन
कां अग्नितें कर मीलन
निर्झरीं वसें कां पाषाण ॥ २ ॥
जीवन असें का आनंद
गोड गुलाबी गुलकंद
कडू कारले कां त्यांत ॥ ३ ॥
जीवनाचे गूढ तत्त्व
ढळेना जयाचे स्वत्व
उरेना तयाला खंत ॥ ४ ॥
जीवनाचे अग्नि कुंड
सदा सेवावे आकंठ
दुरी होय वाळवंट ॥ ५ ॥

●●●

## पंधरा : नवा महाराष्ट्र

* प्रीतम अडांगळे *

**परिचय**— १९३० मध्यें अहमदनगर जिल्ह्यांत जन्म. शिक्षण मॅट्रिकपर्यंत. सध्यां मुंबईत स्प्रिंगमिलमध्यें नोकरी. दादरला वास्तव्य. स्वतःची प्रीतम गायन पार्टी स्थापन केली असून ' प्रीतम गीते ' या नांवाचे पुस्तक प्रकाशित झाले आहे. मूळ नांव यशवंत मुगाजी अडांगळे.

नव्या महाराष्ट्रा नवशक्ती
नसानसा मधुनी मुसमुसती ॥ धृ० ॥
संकटीं धरुनीया धीर
लढले शूर खंबीर वीर

तळ हातीं घेऊनीया शीर
पडले धारा तीर्थी । नसानसां मधुनी मुसमुसती ॥ १ ॥

पूर्वजांच्या कृत्यें पाहीं
स्फुरली ताजी तरणी देहीं
दे आव्हान आम्हासी घेई
ही प्राणाअहुती । नसनसां मधुनी मुसमुसती ॥ २ ॥

वैभव सुख संपन्न कराया
झीजवूं प्रेमें अमुची काया
फुलवूं डुलवूं सौख्ये गाया
तंव मंगल कीर्ती । नसानसां मधुनी मुसमुसती ॥ ३ ॥

महाराष्ट्र जीव कोटी कोटी
अहोरात्र झटती तुजसाठीं
प्रीतमा पिढी पुढची मोठीं
झटणार आहे पुढती । नसानसां मधुनी मुसमुसती ॥४॥

●●●

## सोळा : शेताची राखण

* प्रीतम अडांगळे *

तूं रान पांखरा मारुन भरारा
येऊं नको भरल्या शीवारा ॥ धृ० ॥

क बाड कष्टानी भूमी नांगरूनी
पिकासाठीं केलय म्यां रक्ताचं पाणीं
डुलतोयां बघ, अरे डुलतोयां गहूं हरभ । ॥ १ ॥

सोन्यागत पिवळा हा शाळूं जुंधळा
मोत्याच्या कणसानं भरलाय सगळा
धन लाजवील हे, धन लाजवील हे कुबेरा ॥ २ ॥

न्याहरीसाठीं डोक्यावर पाटी
ही माझी गोरटी बांधा काठीं
घेऊन आली बघ — घेऊन आली झरझरा ॥ ३ ॥

माझं शीवार हें माझंच रान
माझ्याच कष्टानं पिकलया धान
तूं कोण आयता - रं तूं कोण आयता खाणारा ॥ ४ ॥

जा प्रीतमा पांखरा जा इथूनी
नको खाऊं कणसाचं दाणं टिपूनी
मारून खडा — हा मारून खडा करीन ठार ठार ॥ ५ ॥

●●●

## सतरा : कलीकेस !

* नारायण नथू पुरव, दहिसरकर *

**परिचय**— पालघर तालुक्यांतील दहिसर (मधुकर नगर) गांवचे रहिवासी. पंधराव्या वर्षापासून कविता लिहिण्याचा छंद ' शशी ' व ' चालना ' या मासिकांतून कविता प्रसिद्ध झाल्या आहेत.

मुग्ध कलीके; हांस एकदां
खुल्या मनाने हांस
हास्य तुझें ते जना कळूं दे
हीच मनींची आस !
गुह्य मनीचे तुझ्या समजूं दे
उमजूं दे लोकांस

मुग्ध कलीके; हांस एकदा
खुल्या मनाने हांस !
तरू-वेलीवर झोके घेतां
हास्य तुझें ते कानी येऊं दे
अंतरंग तव त्या हास्यातून
तुझें कलीके; मला पाहूं दे !
उघडुनि तुझिया पूर्ण पाकळया
पहा जरा जगतास
मुग्ध कलीके; हांस एकदां
खुल्या मनानें हांस !

## अठरा : परंपरा

* मधुकर दत्तात्रय गोडसे *

**परिचय**— पुण्याचे रहिवासी. मॅट्रिकपर्यंत शिक्षण. प्रसिद्धी पराङ्मुख स्वभावामुळें बरेंच साहित्य अप्रसिद्ध राहिले आहे. भारतीय संस्कृतीचे अभिमानी. काव्य, कथा, लेख लिहिण्याचा छंद. सामाजिक कार्यांची हौस.

मर्द मराठा उडी घालतो संकट समयाला
इतिहासाची साक्ष असे या पहा, भूतकाला ॥ १ ॥
तानाजीनी बाजु सारिलें लग्न रायबाचे
कोंडाण्यावर देह ठेविला सार्थक जीवाचे ॥ २ ॥
बुंदेल्यानी हांक मारिली बाजीरावास
उत्तर त्यांना दिले तयानी धावुनी हांकेस ॥ ३ ॥
रण गाजी तो तात्या टोपे टिळक कालचे ही
सावरकरांची उडी गाजली दिशा दाहि दाहि ॥ ४ ॥

महाराष्ट्राला आहे याचा सार्थ स्वाभिमान
कारण दुसरें भारतभूची वाढ-वि-तो-शान ॥ ५ ॥
हिमालयाची गंगा येते जशी दक्षिणेंत
सह्यगिरीचे पाइक न्हाती गंगे जमुनेंत ॥ ६ ॥
परंपरा ती आज राखिली जणु यशवंतानी
सिद्ध होतसे, महाराष्ट्राचे फुका न कधीं वाणी ॥ ७ ॥

●●●

## एकोणीस : मुंबानगरी

*** गोविंदतनय ***

**परिचय**—मूळ नांव-चिंतामण गोविंद कुलकर्णी. पंतनगर ( घाटकोपर ) येथें वास्तव्य. कल्प फुलें, मंथन, वानगी आदी काव्य संग्रहातून व नियत कालिकांतून काव्य प्रसिद्ध. मुंबई पोलीस खात्यांत नोकरी. वाचन व लेखन यांचा हव्यास. मुख्य मंत्री महाराष्ट्र आणि राष्ट्रपति यांची सत्पत्रे :

नीळ नभांतुन, कां मेघांच्या; सरसरती धारा
मुंबापूरा, न्हाउ घालुनी, मिळती या सागरा
अरबी सागर तटाकटावर; वसली ही नगरी
जणुं शोभते, स्वर्गसुंदरी; अस्मानांत परी ॥ १ ॥
पहाट होतां गिरण्यांचा तो, वाजतसे भोंगा
फुलवण्यांस ते मानवी जीवन; लागतात रांगा
जागा होउन एक जरासी शीळ रेलवेची
सेवा करते तुझी मानवा; बस ही मोलाची ॥ २ ॥
धग धगत्या त्या गिरण्यामधले; कामगार चूर
धूर काढती संपत्तीचा; मजूर भेसूर

मुंबानगरी जागी होता; होतो तो जागा
जगण्यासाठीं कां धडपडतो ? कां विणतो धागा ॥ ३ ॥
संपत्तीच्या चित्रामधुनी; फुलवी जीवन हे
ऐश्वर्याचे सुवर्ण धागे; उकली बनिया हे
भारतभूच्या प्रवेशद्वारीं; खडी असे आज
नव राष्ट्रांचे स्वागत करण्या; सेवेला सज्ज ॥ ४ ॥
परवशतेच पाश तोडण्या; फुंकी रणशींग
भारतभूच्या स्वातंत्र्याचें; बांधी बाशींग
क्रांती नगरी, बनिया नगरी; उद्योग नगरी ॥ ५ ॥
नशेंत युद्धें अणू स्फोटते; मानवी संहार
विश्व बंधुता या पाळुं या; करूं या उद्धार
पंचशील ही तत्त्वे पाळा; तारा मानवता
मुंबानगरी जणूं देतसे; संदेश ही जगता ॥ ६ ॥
जगदंबा पण बनली दुर्गा; महिषासूर मर्दना
पंचशील, स्वातंत्र्य लुटाया; येता तो चायना
भारतीय स्वातंत्र्य रक्षण्या; धांवे मुंबापुरी
शस्त्रास्त्रासह चला बंधुनों; जाऊं हिमगिरी ॥ ७ ॥

## वीस : माहेरची माया

* चंद्रकांत वाडकर *

**परिचय**—सावंतवाडीचे रहिवासी. स्टेट ट्रॅन्स्पोर्टमध्यें ट्रॅफिक कंट्रोलर. कामगारांचे पुढारी. स्टेट ट्रॅन्स्पोर्ट वर्कर्स युनियन, ( इंटक ) रत्नागिरीचे ऑर्गनायझींग सेक्रेटरी. एस्. टी. फेडरेशनच्या महाराष्ट्र कार्यकारिणीचे सदस्य सावंतवाडीला " कामगार

समाचार" नांवाचे पत्र स्वतःच्या संपादकीय जबाबदारीवर २६ जानेवारी १९६३ पासून चालू केले आहे.

लाडकी लेक आईची
मारिली मौज माहेरी
भोगिले सूख मातेचे
वाढले तेज लेकीचे । १ ॥

पुरविले लाड कन्येचे
लाभले प्रेम सर्वांचें
लेकिला प्रेम गोंजारी
चालली लेक सासरीं ॥ २ ॥

आई तूं माझि जन्माची
सोसीले त्रास लेकीचे
अश्रू हे पूस डोळ्यांचे
घेऊं दे प्रेम सर्वांचे ॥ ३ ॥

लाडकी लेक तुमची मी
पुरविले हट्ट कन्येचे
अंतरी—ह्या सुखाला मी
राहुं दे प्रेम सर्वांचे ॥ ४ ॥

लाडकी पोर माहेरीं
वाढली सर्व सूखानी
स्मरूं द्या सर्व सुखाला
सांभाळा माझ्या कन्येला ॥ ५ ॥

●●●

# एकवीस : भोळी नारी

* चंद्रकांत वाडकर *

विसरलीस कां गे विसावे शतक
फोल कल्पना करूनि बसली...सोळाव्या शतकांत
विसरलीस कां गे विसावे शतक ॥ धृ० ॥
वायुगतिनें पुढें चालले—जग कलियुगांत
आहेस तूं शहरी अंगणी—मन मात्र तुझें खेड्यांत
असे भोळे मन तुझें हें—विसरी विसावे शतक
विसरलीस कां गे विसावें शतक ॥ १ ॥
साधी भोळी नारी तुजसम—कुचकामी या शतकांत
मानसिक तूं त्रास सोसुनि—नच दुखवी दुसऱ्यांस
उपयोग गे काय तयाचा—नाहक उणीवा दिसण्यांत
ऐशा नारी नच उपयोगी—कलियुगिया जगतात
विसरलीस कां गे विसावे शतक ॥ २ ॥

● ● ●


## ओरिएन्टल टुथ पावडर

आपले दांत या मंजनानें पांढरेशुभ्र आणि चक-चकीत होतात एक वेळ वापरून खात्री करा. तसेंच खमंग पापड, मसाले, चटणी आर्डरप्रमाणें तयार करून मिळतील.

पी. ॲन्ड के. प्रॉडक्टस् आरे रोड, गोरेगांव,
मुंबई नं. ६२.

## बावीस : रातराणी

* दिनकर मधुसूदन घाटे *

परिचय—मूळ गांव पेण जिल्हा कुलाबा. सध्यां गोरेगांव ( मुंबई ) येथें वास्तव्य. साहित्य विषयक आस्था.

दिनाच्या भीतीनें
दांतखिळी बसून
डोळे मिटून
भयभीत शहामृगाप्रमाणें
दडून बसे जी रातराणी
नारळीच्या झापांतून
झिरपणाऱ्या चांदण्यांत
किरणांच्या करकरणाऱ्या
सळयांच्या हिंदोळ्यावर
झेपावत आहे
दरवळत आहे
मद धुंद तीच रातराणी
लहरी वाऱ्याच्या
नाजूक झुळकेशीं
संगत करणारा
अज्ञात सुगंध
दडलेला दर्प
त्याच रातराणीचा
रेशमी चांदणें ल्यालेली
रातदेवी

विसरली वेळींत जडवायाला
( अन् ) राहिले एकच फूल
त्या शेवंतीचें
तें ही पाहून
जी हंसली
जी एकुलती रातराणी

●●●

## तेवीस : कधीं थांबेल हा काल ?

* हरिश्चंद्र आत्माराम कुबल *

**परिचय**—प्राथमिक शिक्षण. रत्नागिरी जिल्ह्यातील आचरें या गांवी—" जीवन शिक्षण मंदिर " या शाळेंत पार पडले. नंतर पुढील शिक्षण मुंबईत.

पृथ्वीच्या महासागरा
सर्व गिरींची शिखरें
लपविती या भास्करा
दर्शन नाहीं कां रे !
नको नको राग आतां
मेघदूत सारे तुझे
जीवनाची नसे चिंता
करीती स्वागत माझें
अथांग तुझी नगरी
सुसज्ज सैन्य घेऊनी
ते तपस्वी गिरीधारी
बंदिस्थ नको सदनी

महान योद्धे भूधारी
युद्ध रणाची नाभिति
घर्षणें नम्र गती !
युगें युगें किती गेलीं
झिजली सारी शिखरें
पण भरून राहीली
महासागरीं कोठारें !
सारी झीज आणि भर
कधीं थांबेल हा काल ?
नव जगीं कारभार
जैसा पैसा तैसा माल

● ● ●

## चौवीस : जाग आतां तूं सह्याद्रि !

* प्रभाकर मुरलीधर सातपुते *

**परिचय**—प्राथमिक शिक्षण कोंकणांतील चोर्ली मान्डला ( मुरूड जंजिरा ) या गांवी झाले. माध्यमिक शिक्षण कर्जत ( नगर ) बारामती आणि पुणें येथें पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयांत पुढील शिक्षण. १७ व्या वर्षांपासून काव्य लेखन. दोन काव्य संग्रह एक सांजवात आणि दुसरा नंदादीप प्रकाशित करण्याच्या योजनेंत.

जाग आतां तूं सह्याद्रि
वैऱ्याची ही रात्र असे—
पत्थर पत्थर सह्याद्रीचा
तुझ्याचसाठीं हसला शिवबा
माय कुणाची व्याली सांगा

कुणी उभारला सवता सुभा
तो सन्ताजी—मुरारबाजी
हांके सरशी पुन्हा येऊं दे
रंगलेल्या या मातींतून
देशभक्तीचे निखारे फुलूं दे
भ्रांत आम्हां ना पडणार
क्रान्तीवीरांनो बलिदानाची
इतिहासाच्या पानावरती
साक्ष उमटे पावन रक्ताची
पडतां पडतां घायाळ करा
हीच आमुची जिद्द असें
आक्रमकांच्या बांधा कबरी
हा श्वासांतील हुंकार असे
कशास परती ची पाऊल वाट
ही रणशूरांची जात नसे
म्यानाबाहेर तलवारीला
रक्ताचीच लाज असे
फुलवूनि शब्दांचा फुलोरा
आजवरी आम्ही नाहीं लढलो
संग्रामाला जा विचारा
आम्हीं मराठे कशांत भिजलो !
त्या नौबती पुन्हां वाजतिल
होशिल धन्य तूं शिवराया
डिवंचलेल्या या सिंहानें
गर्जतिल दाही दिशा

● ● ●

## पंचवीस : मानस

* प्रभाकर मुरलीधर सातपुते *

जीवन वीणेचा सूर लागता
मला एक लकेर होऊं दे
आकाशीच्या फुलांतील
मला एक फूल होऊं दे
तव थोरवीच्या गिरी शिखरांत
मला सान टेकडी होऊं दे
तव विश्वाच्या अगाधतेंत
माझा एक शब्द फुलू दे
झुळझुळणाऱ्या निर्झरांतील
मला एक वळण होऊं दे
रखरखलेल्या माळरानावर
मला दवबिंदूचा थेम्ब होऊं दे
शिणलेल्या पांथस्थासाठीं
मला तरू छाया होऊं दे
उपेक्षितांच्या अन्तरंगांतील
मला आक्रंदन कळूं दे
रंजल्या पोळल्या जीवांसाठीं
मला जलकण होऊं दे
वादळांतील नौकेचे
मला एक सुकाणू होऊं दे
चित्रकारांच्या कुंचल्यांतील
मला रंगत उमजूं दे

भक्ती रसांतील अवीटतेचा
मला निज हव्यास असूं दे
शारदेच्या लक्ष दीपात
माझी सान्जवात तेवू दे

●●●

## सव्वीस : सुवर्ण भूमि

* लक्ष्मण बबन चव्हाण *

**परिचय**—मु. वडज (जुन्नर) येथील रहिवासी. मुंबईत बालपण. काव्य लिहिण्याचा छंद सध्यां माझगांव (मुंबई) येथें वास्तव्य.

भारत आमुची सुवर्ण भूमि भारत आमुची माता
जुने काळचे वैभव आमुचे आलेत
आज आमुच्या हाता ॥ ध्रु० ॥
गंगा, यमुना, सिंधु, तापी, वहाती सदां निर्मळ धारा
भारत आमुचा जैसा झळके जैसा नभि झळके तारा
भारताची तुळशीने ती लिहिली येथें अमर गाथा ॥१॥
गांधी, जवाहर, सुभाष, टिळक सच्चाईचे दाते
भारतीयांची हृदय विणा हें सदां अमर गीत गाते
एक धडा तो आम्हां मिळाला हसूं प्राण
वहाता वहाता ॥ २ ॥
भेदभाव ते नष्ट जाहले दिन हा नूतन साजला
"जयहिंद" "जय जय भारत" शुभ मंत्र मुखी गाजला
आनंद होई. एक जूटीने येथें आजला श्रमता ॥ ३ ॥

●●●

## सत्तावीस : परिपूर्ति

* अविनाश वाणी *

परिचय—पुण्याच्या कॉमर्स कॉलेजांत बी. कॉम. पर्यंत शिक्षण सध्यां विविध विषयावर वाचन हायस्कूलमध्यें असल्यापासून लिखाणाचा छंद वय २२ वर्षें.

नयन लागतां वाटेकडे तुझ्या
काहूर उठतें मनी माझ्या
सायंच्छाया भिववीती हृदया
आशा क्षणांच्या जाती वाया ॥ १ ॥
मेघ जमलें बघ आकाशीं
गर्जति भयंकर स्वतःशी
सोसाटी वादळ देई धडशी
नको ते येई मनाशी ॥ २ ॥
नयन मग आर्द्रावती
भीतिने निःश्वास थांबती
अशांत येऊनि तूं, कर ती—
स्पंदनांची मग परिपूर्ति ॥ ३ ॥

## अठ्ठावीस : अश्रुनों

* अविनाश वाणी *

नयनानो अश्रु थांबवा ! तयानां आंतच्सिाठवा
प्रीतिची हवी जर किंमत ! मार्ग न तयां हा बरवां ॥धृ०॥
प्रीत काय ह्याचा गंधचि नाहीं ज्याला
त्यागचि प्रितीचे मोल ! मग कसचे ठाऊक त्याला !

प्रीत करूनी लळा लावणे, हा काय खेळ वाटला ?
कीं, खेळणें बरें मनाच्या मनोराज्याला ?
मांडूनि प्रीतीचा डाव
घेऊनि हृदयाचा ठाव
घालावा मग एक घाव
घावाची किंमत जर हवी असेल तुवां
नयनानों अश्रु थांबवा ! तयानां आतचि सांठवा ॥ १ ॥
प्रीत घेऊनि घाव बदलातचि देणें
जोडूनि नाते प्रीतिचे पुनश्चः तोडणे
स्वार्थासाठीं त्याग प्रीतिचा करणें
ही तर सर्व भ्य डाची लक्षणें
त्यागाचि नाहीं हिंमत
प्रीतिची मग काय किंमत
ही तर शुद्ध फसगत
फसगतीतून मार्ग जर नवा तुम्हां हवा
नयनानों अश्रु थांबवा ! तयानां आतचि सांठवा ॥ २ ॥
प्रीत आहे सुंदर, सरूप साकार
असतील जरी भाव प्रीतिचे निराकार
प्रीत आहे दो—आत्म्यांचे मिलन
प्रीत आहे सुखाचे नंदनवन
त्यागचि आत्मा प्रीतिचा
ठेवा असे सुखाचा
क्षण मग तो भाग्याचा
पटवुनि तुवां द्यावयाचे आहे सकल मानवा
नयनानों अश्रु थांबवा ! तयानां आंतचि सांठवा ॥ ३ ॥

●●●

# एकोणतीस : नागरिकांना आवाहन

*** एकनाथ मांडे ***

**परिचय**—बालपणाचा काल देवळाली कॅंप येथें घालविल्यानंतर मुंबईत स्थायिक. शालेय जीवनांतच सार्वजनिक कार्याची आवड निर्माण झाली. निरनिराळ्या स्थळीं मंडळांच्या सेक्रेटरीपदीं नियुक्ती. एक साहित्य प्रेमी व्यक्ति !

नागरिकांनो व्हा जागृत करूं राष्ट्र चे संरक्षण
संघटनेची वेळ आली बनू सुसंघटित
द्वेष सोडुनि एक होउनि व्हावे देशभक्त
मग होईल राष्ट्र विकास करूं राष्ट्राचे संरक्षण ॥ १ ॥

नागरिकांनो स्वतंत्रता ही फुकट मिळाली नाहीं
किती जीवांचे रक्त सांडले या धरतीपायीं
करा विचार हा क्षणभर, करूं राष्ट्राचे संरक्षण ॥ २ ॥

गुलाम म्हणूनी नरकी पिचलो स्मृति ही ताजी आहे
गुलामगिरिची बेडी तुटली वचपा कायम आहे
स्वातंत्र्याचे रक्षण करण्या करूं राष्ट्राचे संरक्षण ॥ ३ ॥

उत्तुंग आमुची उत्तर सीमा घेऊ या परतून
देश आमुचा सांभाळाया कमर कसू सारे जन
फिरवुनी चौफेर नजर करूं राष्ट्राचे सरक्षण ॥ ४ ॥

बांधव म्हणूनी विश्वासघात केला
अशा असुरांना करूं बेचिराख
नागरिकांनो व्हा जागृत करूं राष्ट्राचे संरक्षण ॥ ५ ॥

आपल्या सभोवती पहा पेटला युद्धाचा वणवा
स्वार्थ सोडुनी प्राणपणाने प्रथम तया विझवा
हे एकच कार्य पवित्र करूं राष्ट्राचे संरक्षण ॥ ६ ॥

## तीस : श्रावण पक्षी

* प्र. वि. इनामदार ( प्रसाद ) *

**परिचय**—तासगांव ( जि. सांगली ) येथील रहिवासी. प्रा. शिक्षक. काव्य व टीका वाङ्मयाची अभिरुची लेखन, गायन, चित्रकला यांचा छंद. काव्य गायनाची आवड प्रकाशन - लोकमित्र, शिशुरंजन, मुलांचे मासिक यांतून व भारत, इंद्रधनु, नव कलिका, हिरवळ इ. प्रा. संग्रहातून.

श्रावण पक्षी तुझ्या डोळ्यांतला
निळाइत एक गिरकी मारून
दंवानें ओलसर भिजलेले
पंख फडफडत
हळूच उतरतो
अलगद् झेपावतो
गव्हाळ अवनीवर

मग माझ्या मनाचे
अनंत रंगी भावांनीं गुंफलेलें
अनिल संगति अलगद् झुलणारें
चुकुन राहिल्या झुकल्या फांदीवर
रेशमी मुलायम
आसरा होतें त्याचें घरटें

तमांत बुडल्या तुझ्या कायेवर
किण किणणाऱ्या हरित पर्णी
प्रकाशतात हळूवार दोन काजवे
आणि मग
मिटल्या नेत्र कुशींत
बिलगतात दोन पारवे

●●●

## एकतीस : जीवन–नाट्य

* यशवंत कृष्णराव चिखलीकर *

**परिचय**– मूळगांव - अमरावती. एम्. ए. बी. टी. पर्यंत शिक्षण. सरकारी शाळेंत व्याख्याता. साहित्याची आवड अनेक लेख–मासिकांतून व वर्तमान पत्रांतून प्रसिद्ध. इतरहि कविता निर-निराळ्या काव्यसंग्रहाद्वारें प्रसिद्ध.

विचार करतो मानव निशिदिन !
काय असे खरोखर जीवन ?
कोणी सांगती बाग फुलांची ।
सुंदर सुमधुर फळा फुलांची ।
परि पाहतां पुष्पें सुकली ।
फळांची तर दुर्गंधि सुटली ॥

कांहीं वदती जीवन-सागर ।
विखुरती लाटा अनेक दूरवर ।
मानव घाबरे पाहुनि धोका ।
तया न सांपडे सुयोग्य नौका ॥

कोणी जीवना रणांगण वदती।
दारिद्र्य संकटें शत्रु ठरती।
शत्रूंशीं त्या लढतां लढतां
भुई होई थोडी पळतां ॥

एकचि साजे नांव जीवना।
' रंगभूमि ' ती भासे नयना।
मानव-नर्तक नाच नाचतो।
पात्रांशीं त्या समरस होतो।
हुबेहूब देखावे करतो।
नाटक सरता—नाट्य संपतें
नट अन्—मरणाच्या
पडद्यांतचि शिरतो ॥
विचार करतो मानव निशिदिन
काय असे खरोखर जीवन ?

## बत्तीस : तोडुनि टाका त्या झाडाला

* शं. गो माईणकर *

**परिचय**—धसवाडी, ठाकुरद्वार ( मुंबई ) येथें वास्तव्य. मुळचे रत्नागिरी जिल्ह्यातले रहिवासी. साहित्याची आवड. अधून मधून कविता लिहिण्याचा छंद.

तोडुनि टाका त्या झाडाला ॥ धृ० ॥
पानें छाया नाहीं ज्याला
अडचण होई घराला
कां त्याचा लोभ धरिला ॥ १ ॥

उपयोग म्हणुनी लाविलें झाड
पाणी घालुनी केली वाढ
समजुनी आले तें ओसाड
नका धरूं त्याची चाड
द्या मुळासकट फेकुनि त्याला ॥ २ ॥
गुलजार दिसले कोवळेपणीं
म्हणुनी लाविलें माझे अंगणी
समजुनी आले मोठे पणीं
प्राणघातक होई जिवाला ॥ ३ ॥
लोक म्हणति जरी तुला अधम
तोडुनि टाकणें हाचि धर्म
समजावें तें कर्तव्य कर्म
भिऊं नका लोकांच्या बोला ॥ ४ ॥

## तेहतीस : सदाफुली

* इनासकून *

**परिचय**— मालाडचे रहिवासी. सांताक्रुझ येथें मिशन स्कूलमध्यें शिक्षक. मराठी साहित्यासंबंधी ओढा. बऱ्याच कविता लिहिल्या असून कविसंमेलनांत भाग घेतला आहे. स्वतःचा काव्यसंग्रह प्रकाशित करण्याच्या विचारांत आहेत.

कोषामधल्या गवाक्षांतून
हळूंच बघते डोकावून
पहिल्या वहिल्या नजरेंत बुजली
लाजरी बुजरी सदाफुली ॥ १ ॥

पहांट वारा घालीत धिंगा
म्हणतो चल ये घालूं पिंगा
तारुण्याच्या मदांत हसली
लाजरी बुजरी सदाफुली ॥ २ ॥
हांसत खिदळत चाले नौका
मारीत चाले हसरा शिक्का
भिरभिरते तरुणींच्या गालीं
लाजरी बुजरी सदाफुली ॥ ३ ॥
मदनाच्या त्या धनुकलींतून
नाजुक नजरेचा तीर लावुन
खुणावितें मज फिदी फिदी
लाजरी बुजरी सदाफुली ॥ ४ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र. क्र. 12631
शाखा

## चौतीस : पान

* इनास कून *

तरुवरी पान करितं गान
उन्हाच्या तीरानें फुटला धुळीचा खजिना
पिसाटला वारा भकासल्या दिशा
अनंताच्या पोकळींत—
ग्रीष्माचें, करितें गान, तरुवरीं पान...१

सरीवरि सरींचा साहुनि मार
डोकावुनि वर, जगाची चाहुल गार गार
नद्या नाल्यांच्या सहजीवनीं—
वर्षाचें, करितें गान तरुवरीं पान...२

जर्द हिरवी मुग्धा बनली, किशोरी
षड्रागांचा लोंढा उरीं
सकाळते अंगोपांगीं—
हेमंताचें, करितें गान, तरुवरीं पान...३
अनुरागाच्या प्रांगणीं चांदण्याची फुलें
यौवन भारें तरु डवरें
एकटेपणाची हुर हुर उरीं—
शरदाचें, करितें गान, तरुवरीं पान...४
पानझडीच्या जगरहाटीनें
हुडहुडी भरली कन्यादानें
संगमांत विरला वियोग
शिशिराचें, करितें गान, तरुवरीं पान...५
गाभुळलेलीं फळें कुशींत
निजलीं पुष्पांच्या शेजींत
हळूंच फिदी फिदी हसून—
वसंताचें, करितें गान, तरुवरीं पान...६

●●●

## पस्तीस : उठी रे श्रीनंदलाला

* भा. रा. गोळे *

**परिचय** – कुलाबा जिल्ह्यांतील पिटसई ( कोंड ) येथील रहिवासी. हार्मोनियम कला अवगत पूर्वी भजनाचा कार्यक्रम करीत सध्यां नोकरी करत आहेत. कविता लिहिण्याचा छंद.

उठी रे श्रीनंदलाला दिनकर
उदया आलाऽऽआलाऽऽ ॥ ध्रु० ॥

प्राण जिवाचे तुझे संवगडी जमले दाराशी ।
कांबळ खांदी घेऊन म्हणती उठी रे हृषीकेशी ।
धेनू चारण्या गाई सांवळ्या, हंबरली कपीला ॥ १ ॥
प्रातःकाळी पाणवठ्यावर गोपीकांचा मेळा ।
गीति सांगे रात्री माधव स्वप्नी माझ्या आला ।
तरीच दमलाऽकां गोपाळा । म्हणूनी उशीर झाला ॥२॥
लाल किरण अंगावर लोळे हांस जग जिवना ।
वृद्ध भुपाळ्या आळवूनी गाती जाग कशी येईना
स्नान करूनी या तुंला पूजिती ।
बघना उघडी डोळा ॥ ३ ॥
उषःकालच्या वायु लहरी येतां बघ हरघडी ।
उन्मादानें हांसे राधीका तुज वाचूनीया वेडी ।
पावन करी रे या दासाला दारी महिपत आला ॥ ४ ॥

## छत्तीस : भक्ति गीत

* भा. रा. गोळे *

भक्ति प्रेम धरा जीवन साधावया
पण ऐसे समजूं नका कीं, पाप जाईल लया ॥ ध्रु० ॥
जो तो अपुल्या कर्मानें भरतो ।
राव असो वा रंक असो ॥
सगुण म्हणतो मीच भला ।
म्हणुनी विकार तया जडतो ॥
कर्तव्य कर्म धरा बुद्धी वाढावया ॥ १ ॥
जो तो अपुली माणुसकी जपतो ।
वाढविण्यासाठीं थोरपण ॥

सुख मोह धन झाला अनावर तर ।
मनास वाढवी गर्व कपट गुण ॥
धर्म प्रेम धरा नियम राखावया ॥ २ ॥
जो तो अपुल्या भल्यासाठीं ।
खटपटी नाना करीं ॥
अत्य अहिंसात्मक वृत्ती ज्याची ।
भाऊ म्हणे पाप नये जवळी ॥
सत्य निती धरा जीवन साधावया ॥ ३ ॥

## सदतीस : तुझा सहवास मला लाभला

* सुधाकर नारायण मालंडकर *

**परिचय**—मालवणचे रहिवासी. गोरेगांव येथें स्थायिक. साहित्याची आवड. गोरेगांव का. क. केंद्राचे सल्लागार. साहित्य मंडळाचे कोषप्रमुख, लेखन अन् वाचन याचा छंद.

कुमुदिनीच्या उगवत्या कळ्या
विचलीत झाल्या त्यांत पांकळ्या
दंव थेंब ते पडले त्यावरी
जसे भासते कुमुद निलांबरी ।
आकाशीच्या उंच धरेवर
चंद्र आला पहा वरचेवर
शुभ्र पडे हें असें चांदणें
मज आनंद होई साजणे
मध्य रात्रींच्या शांत प्रहरी
तुजसंगे मी जाई दूरवरी ।

हितगुज माझ्या मनांतले ते
बदले सखये तुला सविते
रात्र चांदणी निघून गेली
शुक्र चांदणी नभांत आली
कुकुटध्वनी मज ऐकु आला
झुंजूमुंजूचा प्रहर झाला
तुझा सहवास मला लाभला ।

## अडतीस : मार्ग बदलतांना

* जनार्दन कृष्णाजी नाईक *

**परिचय**—गोरेगांव ( मुंबई ) येथें वास्तव्य. मॅट्रीकपर्यंत शिक्षण का. क. केंद्राच्या साहित्य मंडळाचे सभासद. लेखनाची व वाचनाची आवड.

आजवरी मी तुला फसवले
परी मी नाहीं अतां एकली
जीवनाच्या अथांग सागरीं
हाकली मी ही नाव कशी तरी ॥ १ ॥
उषःकाल ही पूर्व प्रभा चमकली
परंतु येता तिचा सारथी
फांकली ही कुठें तरी
तसेंच माझे आज तरी ॥ २ ॥
तुझ्यासारखे भ्रमर भुंगले
परंतु नाहीं त्यांच्या नशीबी

मधु चाखणें जन्मभरी
नियतिचा विधी चालला आज तरी ॥ ३ ॥
रे दुःखीमना निराश होऊनी
उगाच उर हा बडवू नको
याच्या पुढती जीव कुणावर
फुकाच तूं ही लावू नको ॥ ४ ॥

●●●

## एकोणचाळीस : मला वाटते

* मुकुंद अर्जुन चव्हाण *

**परिचय**—गोरेगांव येथें वास्तव्य. का. क. केंद्राचे सल्लागार, साहित्य मंडळाच्या कार्यकारिणीचे सदस्य. आदर्श विद्यालय, गोरेगांव येथें नोकरी. नाटकांत काम करण्याची आवड, साहित्य लिहिण्याचा छंद.

रात्र असावी मधुर चांदणी—
हवा असावी धुंद गारवीं—
अशाच समयीं सागर तीरीं—
कवेंत माझ्या तूंच असाविस—
शिक्का मोर्तब मम प्रेमाचा—
अलगत अधरिं तव उमटावा
सलज्जतेनें ईऽऽश्य शब्द तो
ओठींचा ओठींच विरावा—
रम्य अशा या निर्जन स्थळी—
उधाण यावे प्रीत सागरी—

●●●

# चाळीस : तुझ्या प्रीतिचे चांदणे

*** नानक अहेर ***

**परिचय**—नांदुर्डी ( जि. नाशिक ) येथील रहिवासी. सध्यां मुंबईत वास्तव्य. सिद्धार्थ कॉलेजमध्यें शिक्षण. साहित्याची आवड. सन १९५० पासून काव्य लिहिण्याचा छंद.

तुझ्या प्रितिचे चांदणें
पडे माझिया दारांत
अन् बहरून गेला—
माझा मन पारिजात—

बहरला गंध सारा
धुंद होई सारी धरा
चैत्यन्यांचा चैत वारा
साद घालितो कानांत—

काव्य काननांत उठें उठें,
एक गोड संवेदना
कणा कणांत घुमली
दिव्य अस्पष्ट भावना—

व्योमी व्यापला काळोख
चंद्र दडे ढगांआड
बावरली वृक्षलता
घट्ट बिलगे वृक्षांस

●●●

# एकेचाळीस : आवर्त

* रामकृष्ण तुळशीराम चौधरी *

परिचय—मुंबई विश्वविद्यालयची बी. ए. परिक्षा उत्तीर्ण. खानदेशांतील यावल तालुक्यांतील रहिवासी. सध्यां गोरेगांव ( मुंबई ) वास्तव्य. साहित्य, काव्य व समाजकार्यांची आवड.

कार्तिकाची दुपार होती
गगनीं मेघ विहार करिती
सावळा एक, पांढरें कुणी
शामा भोंवतीं जणुं सवंगडी ॥ १ ॥

खालीं नील सागरांत
लहरींच्या लाटा उसळती
परिस्फुटे त्यामधुनी एक
अस्पष्ट मंगल वाणी ॥ २ ॥

वाणीचा तो अर्थ कळेना
लक्ष न द्यावे ! तेंहि जमेना
डोलावती अचलही माना
लय त्याची माझ्या मना ॥ ३ ॥

तानेच्या त्या मंगल नादें
कंपीत सृष्टि, कंपीत वारे
अंतरी माझ्याहि शिरलें
लेऊनी ते नवथर लेणें ॥ ४ ॥

लयींच्या त्या आवर्तांत
गरगरां फिरें मन माझें

परमानंदाच्या शिखरावरूनी
गर्तेंत पडें ते केविलवाणें ॥ ५ ॥

वेड त्याचे त्याला असें कीं
घेई पुन्हां उडी त्यांत
फिरूनी फिरूनी शोधी
गभीरतेत त्या संजीवक ॥ ६ ॥

पुन्हां अशी तान उसळता
उफाळती त्याच्या व्यथा
धांव त्याची त्याकडेच्च
वाटे त्याला जरी हें वृथा ॥ ७ ॥

●●●

## बेचाळीस : म्हणालीस 'हो' दैव बहरलें !

* रंगनाथ शंकर बंदसोडे *

**परिचय**—जन्म १६ मार्च १९३१ मु. कणेगांव ता. वाळवे, जि. सांगली. लहानपणापासून काव्याची आवड. अनेक प्रातिनिधिक काव्यसंग्रहांत कविता समाविष्ट "शारदा" प्रातिनिधिक काव्यसंग्रहाचे सहसंपादक. सध्यां सेंट्रल टेलिग्राफ ऑफिस मुंबई येथें तारमास्तर आहेत.

म्हणालीस 'हो' दैव बहरलें
तुझ्या प्रीतिच्या नव तेजानें जग माझें उजळलें
म्हणालीस 'हो' दैव बहरलें ! ॥ ध्रु० ॥

विचारतां मी हसलिस गालीं
गौर मुखांवर चढली लाली

लाजेनें तूं चूर जहालिस भाव तुझें समजलें
म्हणालीस 'हो' दैव बहरलें ! ॥ १ ॥

हात तुझें मी हातिं घेतलें
हृदय तुझें मम हृदया भिडलें
उचलतांच मी तुझी हनुवटी डोळें तूं मिटवलें
म्हणालीस 'हो' दैव बहरलें ! ॥ २ ॥

डाव्या बाजुस मान वळवलिस
जवळ ओढतां तूं 'हो' वदलिस
पदरांमधिं तूं तोंड लपवता चुंबन मी घेतलें
म्हणालीस 'हो' दैव बहरलें ! ॥ ३ ॥

●●●

## त्रेचाळीस : अशीं सखे तूं प्रिया लाभलिस !

* रंगनाथ शंकर बंदसोडे *

पाहुनि सुंदर तुझी लोचनें कमळें मिटली जळीं
शुभ्र दात तव पाहुनि मौक्तिक दडलें दर्या तळीं !
नाजुक कोमल तव देहाचा सुवास मधु पाहुनी
सुगंध गेला दूर साजणे कळ्या, फुलां सोडुनी !
लालबुंद तव ओठ मुलायम पाहुनि, परसांतली
हंगामांतहि वेलीवरची पिकली ना तोंदली !
लाल गुलाबी गाल पाहुनी गुलाब कोमेजले
क्षितिजावरचे लालरंग अन् फिकट फिकट जाहलें !
सुंदर गोंडस गोल गोरटे वदन तुझें पाहुनी
चंद्रानें बघ तोंड लपवलें ढगा आड जाऊनी !
छातीवरलें नयन मनोहर उंचवटे पाहुनी

सृष्टीमधली सुंदर दृश्यें गेली ओसाडुनी !
लाजरीच तूं, लाजाळूपण तुला किती शोभते
पाहुनि तुजला लाजाळूचें खिजलें मनिं रोपटे !
अशी सखे तूं, प्रिया लाभलिस प्रीत मनिं हासतें
परंतु माझ्या जिवास खटके नाक तुझें धाकटे !

●●●

## चव्वेचाळीस : श्रद्धांजली

* सौ. नलिनी गंगाधर देवघरे *

**परिचय**—जन्म मूळतापी ( बैतूल जिल्ह्यात ) गोरेगांव येथें वास्तव्य. मॅट्रीकपर्यंत शिक्षण. समाज कार्याची व साहित्याची आवड.

जयवंत कुसुम हिरकणी ।
अमोलिक गुणी दिपवी जगताला
कोंदणातुनी ही कशी निखळली । अवचित या काला
" फुलवात " प्रीतिची ज्योत ।
अनील हृदयांत तळपित ज्याने
" दीपकळी " फुलविली रसिक
भुलविली देऊन " दीपदानें "
महाराष्ट्र देवि शारदा नमवी नरमदा । बुद्धी अभिमानी
चैतन्य स्फुर्तिची खाण पंडिता । मुग्ध कुसुमराणी
वात्सल्य जीवन साफल्य किर्ति कैवाल्य अनुप स्वापिनी
प्रेमळा माऊली सतत साऊली । निगर्वि मुर्तिमनी
कौमुदि धवल चंद्रिका । मयुर सारिका भुवनीं अवतरली
सौगंध गुणाचा जगीं पसरूनी आज कुठें लपली

●●●

# पंचेचाळीस : परस्पर भिन्न

* अरविंद एकबोटे *

**परिचय**—गोरेगांव येथें वास्तव्य. साहित्य मंडळाच्या कार्यकारिणीचे सदस्य. कामगार कल्याण केंद्राचे एक चांगले कार्यकर्ते.

विरहाच्या वैराग्यांत, प्रीतिला बहर आहे ।  
धगधगत्या ज्योतीखाली, अंधाराची छाव आहे ॥ १ ॥  
रखरखत्या उन्हांत, वृक्षाखाली शीतल छाया  
थकलेला वाटसरूं, घेई विसांवा ॥ २ ॥  
एकीकडे आहे, अणुशस्त्रांचे भूत  
दुसरीकडे वावरी, शांतीचा दूत ॥ ३ ॥  
असती परस्पर भिन्न, या गोष्टीं  
परी नांदती वाढती, या जगतीं ॥ ४ ॥

●●●

साटम
आर्ट
साईन बोर्ड,
डिझाईन्स,
नेमप्लेटस्
↓
करितां
भेटा—

झटपट
टुथ पावडर



दांत चकचकीत होण्यास
दातांतून रक्त येणें व हिरडया सुजणे
तोंडाला दुरगंधी येणे या सर्वांचा
प्रतिबंध करणारी
साटम बदर्स
गोरेगांव मुंबई,नं.६२

बनविणार :—शांताराम हि. साटम.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 28/६८० वि: नाटक
क्रमांक १५८० नों. दि. २८-६-६६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १२८३९
संदर्भ शाखा (स्थळ

REFBK-0012731
REFBK-0012731